MHRG110004782018

<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १८०/२०१८</u>

**निशाणी क्र. १४ वर आदेश**

(पारीत दिनांक ११.१०.२०२३)

प्रस्तुतचा अर्ज संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १८०/२०१८ हे प्रकरण मा. ग्राम न्यायालय, तळा येथे चालविण्यात यावे याकरिता तक्रारदाराने दाखल केला आहे.

२. तक्रारदाराच्या कथनांनुसार, प्रस्तुतच्या प्रकरणाची मा. ग्राम न्यायालय, तळा येथे सुनावणी झाल्यास सर्वांना सोईस्कर होईल. सदरचे प्रकरण मा. ग्राम न्यायालय, तळा येथे चालविल्यास आरोपीला कोणतेही नुकसान होणार नाही व प्रस्तुतचा प्रकरणावर देखील कोणताही परिणाम होणार नाही. तसेच, प्रकरणाचा निपटारा देखील लवकरात लवकर होईल. म्हणुन अर्ज मंजुर करण्यात यावा अशी तक्रारदाराने विनंती केली.

३. आरोपीने सदर अर्जास जोरदार हरकत एवढे म्हणणे सादर करुन अर्जास विरोध दर्शविला आहे.

४. प्रस्तुत प्रकरणातील दस्तऐवजांचे बारकाईने अवलोकन केले असता असे दिसुन येते की, अभियोगपक्षाच्या कथनांनुसार घटना ही तळा पोलीस स्टेशन यांच्या हद्दीमध्ये घडलेली आहे. सदर घटनेचे ठिकाण तालुका तळाच्या अंतर्गत असल्याचे अभियोगपक्षाचे कथन आहे.

५. तळा येथे मा. ग्रामन्यायालयाची स्थापना करण्यात आलेली आहे व तेथील मा. ग्रामन्यायालय कार्यरत आहे. ग्राम न्यायालय अधिनियम, २००८ मधील अध्याय २ मधील व पहिल्या अनुसुचीच्या भाग १ मधील तरतुदीनुसार

प्रस्तुतच्या प्रकरणाची सुनावणी मा. ग्राम न्यायालय, तळा येथे होणे योग्य व रास्त असल्याचे दिसुन येते. कारण अभियोगपक्षाच्या कथनांनुसार गुन्हा हा तळा तालुक्याच्या हद्दीमध्ये घडला. प्रस्तुतच्या प्रकरणातील गुन्हयासाठी दोन वर्षांपर्यंतचा कारावासाची शिक्षा नमुद आहे.

६. वरील सर्व बाबींचा एकत्रीतरित्या विचार करता, असे दिसुन येते की, प्रस्तुतच्या प्रकरणातील घटना मा. ग्राम न्यायालय, तळा यांच्या अधिकारक्षेत्रामध्ये घडल्याबाबत नमुद आहे. प्रस्तुत प्रकरणाची सुनावणी मा. ग्रामन्यायालय, तळा येथे करणे योग्य व रास्त असल्यामुळे सदरचे प्रकरण मा. ग्राम न्यायालय, तळा येथे वर्ग करण्यात येते. सबब मी, खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१. सदरचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रस्तुतचे प्रकरण मा. ग्राम न्यायालय, तळा येथे वर्ग करण्यात यावे व त्याबाबतची नोंद संबंधित रजिस्टरला घेण्यात यावी.

३. तक्रारदार व आरोपी यांनी दिनांक ०२.१२.२०२३ रोजी मा. ग्राम न्यायालय, तळा येथे उपस्थित राहावे.

GAJANAN CHANDRAKANT FULZALKE

Digitally signed by GAJANAN CHANDRAKANT FULZALKE
Date: 2023.10.12 17:38:36 +0530

माणगांव, (जी. सी. फुलझळके)

दिनांक – ११.१०.२०२३ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, माणगांव